महाराष्ट्र शासन
# ग्राम पंचायत, विभाग जिल्हा परिषद ,जळगांव
१ला मजला जि.प नवीन प्रशासकीय इमारत,बळीरामपेठ जळगांव
दुरध्वनी क्र.०२५७-२२२९११० ईमेल- dyceovpjalgaon@gmail.com

जा.क्र.ग्राप/आस्था-2/आरआर/642 /2024
दिनांक :- 04/10/2024

प्रति,

**निवड व प्रतिक्षा यादीतील गैरहजर उमेदवार**

विषय :- जिल्हा परिषद, सरळसेवा पदभरती परिक्षा – २०२३ कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी कागदपत्रे पडताळणी करीता गैरहजर असलेले उमेदवार यांना अंतिम संधी म्हणुन दिनांक 07/10/2024 रोजी सकाळी ११.०० वा. उपस्थित राहण्याबाबत..

संदर्भ :-1. या कार्यालयाकडून दिनांक २४/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जि.प. सरळसेवा पदभरती-२०२३ बाबत जिल्हा निवड समितीची तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षाधिन यादी

2. या कार्यालयाचे पत्र क्र.ग्राप/आस्था-2/आरआर/632/2024 दि.24/09/2024

3. या कार्यालयाचे पत्र क्र.ग्राप/आस्था-2/आरआर/636/2024 दि.27/09/2024

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती परीक्षा-२०२३ च्या अनुषंगाने कंत्राटी ग्रामसेवक पदाकरीता विचाराधीन उमेदवारांची तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षाधीन यादी जिल्हा परिषद जळगांव www.zpjalgaon.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २४/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून उमेदवाराचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता संदर्भ क्र.2 व ३ नुसार बोलाविण्यांत आलेले होते. तथापी आपण मुळ कागदपत्रे पडताळणी कामी दोनही वेळेस गैरहजर होते.

तथापी सदर गैरहजर उमेदवारांना अंतीम संधी म्हणुन पुनश्च कागदपत्रे पडताळणीसाठी दिनांक 07/10/2024 रोजी बोलविण्यांत येत आहे. तरी आपण मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर, आवश्यक सर्व दस्तऐवज तसेच जाहिरातीत नमुद (अ.न.१९) प्रमाणे आवश्यक कागदपत्रे त्यांची १ प्रत सांक्षाकित सह जिल्हा परिषद, जळगांव (जि.प नवीन प्रशासकीय ईमारत, १ ला मजला, बळीराम पेठ, शास्त्री टॉवर जवळ,जळगांव) येथे न चुकता उपस्थित रहावे. उक्त दि. 07/10/2024 रोजी कागदपत्रे/दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहिल्यास गैरहजर राहणा-या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

04.10.24.

(अनिकेत पाटील)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.)**
**जिल्हा परिषद जळगांव**